दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १८५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.३० सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# वर्षा सहलीसाठी पांडवकडा येथे आलेल्या १७ ते १८ जणांची सुटका

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल** : पनवेल जवळील खारघर परिसरात असलेल्या पांडवकडा धबधब्यावर वर्षासहलीसाठी आलेले १६ ते १७ जणांना अग्नीशमन दलाच्या जवानांनी खारघर पोलिसांच्या मदतीने व ग्रामस्थांच्या मदतीने सुखरुप बाहेर काढले आहे.



शासनातर्फे गेल्या दोन दिवसापासून मुसळधार पावसाची सुचना देण्यात आली होती, असे असतानाही मुंबई व नवी मुंबई परिसरातून काही तरुण-तरुणी वर्षासहलीसाठी पांडवकडा धबधबा परिसरात आले होते. त्यात अचानकपणे मुसळधार पाऊस सुरू होवून पाण्याचा लोंढा वाढल्याने त्यांना त्या भागातून बाहेर पडणे अशक्य झाले होते. याबाबत त्यांनी पोलिसांशी संपर्क साधला असता खारघर अग्नीशमन तसेच कळंबोली अग्नीशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहचून त्यांनी पाण्याच्या लोंढ्याच्या दोन्ही बाजूस शिडी लावून त्याद्वारे या नागरिकांना बाहेर काढले आहे. या परिसरात कोणीही वर्षा सहलीसाठी येवू नये असे खारघर पोलिसांनी फलक लावले असतानाही बेजबाबदापणे वर्षा सहलीसाठी येणाऱ्या नागरिकांमुळे अनेकांचे जीव टांगणीला लागले असतात.

# नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांचा बेलापूर - जेएनपीटी रस्त्यावरील वाहतूक पाहणी दौरा

## जेएनपीटी, दास्तानफाटा परिसरातील सुमारे १५० हेक्टर क्षेत्रात वाहनांसाठी तीन ठिकाणी पार्किंग लॉट तयार करणार



**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी कोऑर्डीनेशन टीम तयार करण्यात आली असल्याची माहिती राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे. ठाणे, रायगड आणि पालघर आदी तीन जिल्ह्यात दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे.

या वाहतूक कोंडीचा त्रास नागरिक, वाहनचालकांना भेडसावत आहेत.मोठ्या प्रमाणात भेडसावत असलेल्या वाहतुकीची समस्यांची पाहणी आणि वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी काल २९ सप्टेंबर २०२१ रोजी ठाणे- बेलापूर व बेलापूर- जेएनपीटी दरम्यानचे रस्ते आणि होणाऱ्या वाहतुकीची राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी केली. याप्रसंगी त्यांच्यासोबत जेएनपीटीचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ, सिडकोचे महाव्यवस्थापक संजय मुखर्जी, ठाणे, नवीमुंबईचे पोलिस आयुक्त बिपीन कुमार सिंह, माजी आ.मनोहर भोईर, जेएनपीटी विश्वस्त दिनेश पाटील उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे आणि संबंधित विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या दरम्यान मंत्र्यांनी उरण- जेएनपीटी परिसरातील रस्त्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी केली.या पाहणी नंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातुन दररोज .../२

## संक्षिप्त...

### तुम्ही स्थानिक भुरट्या चोरांविरोधात लढताय, मी तर डाकूशी लढतोय : नाना पटोले

**पालघर : वृत्तसंस्था**

पालघर जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपावर जोरदार हल्ला केला आहे. काँग्रेसचा विचार हाच देशाला, संविधानाला व सर्व जातीधर्माच्या लोकांना तारणारा आहे. काँग्रेसला इतिहास आहे व भविष्यही आहे. मात्र, भाजपाकडे इतिहासही नाही आणि भविष्यही नाही. भाजपाने देश विकायला काढला आहे. डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी दिलेले संविधानही बदलण्याचा घाट घातला आहे. देशाची संवैधानिक व्यवस्था संपविणाऱ्या भाजपा राक्षसाला मतदानाच्या माध्यमातून संपवून टाकण्याचे आवाहन नाना पटोले यांनी केले आहे. पालघर येथे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पोट निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पालघर येथे आले होते. यावेळी आपल्या विरोधात निवडणुकीत पैशांचा वापर केला जाईल. निवडणुका पैशांनी जिंकता येतात हा समज बदलण्याचे काम केले पाहिजे. निवडणुकीच्या माध्यमातून कामगार शेतकरी, बेरोजगारांच्या प्रश्नासाठी त्यांच्यापर्यंत पोहोचा म्हणजे पैशांची आवश्यकता भासणार नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, तुम्ही निवडणुकीत स्थानिक भुरट्या चोरांविरोधात लढताय, मी तर डाकूशी लढतोय असेही नाना पटोले म्हणाले. याशिवाय, कोरोना हा मानवनिर्मित आजार भाजपाने देशात आणल्याचेही त्यांनी सांगितले.

# बेकायदेशीरपणे गॅस सिलेंडरचा व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील पोयंजे गावाच्या हद्दीत असलेल्या एका धाब्याच्या परिसरात बेकायदेशीररित्या टँकरद्वारे गॅस काढून तो सिलेंडरमध्ये भरुन त्याची विक्री करणाऱ्या चार जणांविरुद्ध पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई करून गॅस टँकर, मोटार सायकल, महिंद्रा कंपनीचा बोलरो या मिळून जवळपास ३९ लाख १४ हजार ८७५ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.




तालुक्यातील पोयंजे गावाच्या हद्दीतील मनोज ढाब्याच्या परिसरात अशा प्रकारे गॅस टँकर उभे करून त्याद्वारे गॅस काढून तो इतर सिलेंडरमध्ये बेकायदेशीररित्या भरला जात असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून त्या ठिकाणी असलेले सोमराज विष्णोई (२३), मांगीलाल विष्णोई (१९), सुभाष पुनिया (२४) व जलालउद्दीन अलीमउद्दीन खान (२९) या चौघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून टँकर नं.एमएच-१२-एलडी-५३३३, महिंद्रा बोलेरो जीप, हिरो कंपनीची मोटार सायकल, .../२

# श्रीवर्धन नगर परिषदेचा जलशुद्धीकरण प्रकल्प रखडला

## श्रीवर्धनचे नागरिक शुद्ध पाण्याच्या प्रतीक्षेत

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मागील पंधरा वर्षापासून श्रीवर्धन नगरपरिषद मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची एक हाती सत्ता आहे. येत्या नोव्हेंबर महिन्यामध्ये श्रीवर्धन नगरपरिषदेची सार्वत्रिक होणार आहे. प्रत्येक वेळच्या निवडणूक जाहीरनाम्यात श्रीवर्धन वासियांना पिण्याचे शुद्ध पाणी लवकरच उपलब्ध करून देणार, अशा प्रकारचे आश्वासन देण्यात येत होते. परंतु पंधरा वर्ष पूर्ण व्हायला आली तरीही अद्याप पर्यंत जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम सुरु झालेले नाही. रानवली येथील पाझर तल-ावातून श्रीवर्धन शहराकडे जलवाहिनीद्वारे थेट पाणी येते. पावसाळ्यात हे पाणी अत्यंत खराब येते, म्हणजे जवळ जवळ चिखला सारखेच पाणी दिसते. त्याचप्रमाणे रानवली पाझर तलावापासून आराठी येथील साठवण टाकी पर्यंत जलवाहिनी वारंवार कुठे ना कुठे फुटण्याचे प्रकार घडत असतात. सदरची जलवाहिनी ही जवळजवळ चाळीस ते पंचेचाळीस वर्षे जुनी झालेली आहे.

सदरच्या जलवाहिन्या कास्टिंग मेटलच्या वापरण्यात आलेल्या आहेत. पाणी अशुद्ध येत असल्यामुळे श्रीवर्धन शहरातील नागरिकांना आपल्या घरांमध्ये आरओ फिल्टर मशीन बसवायला लागल्या आहेत. जलशुद्धीकरण प्रकल्पा बरोबरच सदर जलवाहिन्या नवीन टाकणे गरजेचे आहे. तसेच श्रीवर्धन शहरातद-खील असलेल्या जलवाहिन्या अनेक वेळा फुटण्याचे प्रकार करतात त्यामुळे जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम झाल्यानंतर श्रीवर्धन शहरातील जलवाहिन्या देखील नवीन टाकणे क्रमप्राप्त आहे. सदर जलशुद्धीकरण प्रकल्पासाठी अनेक वर्षांपासून निधी मंजूर असून प्रकल्पाचे काम सुरू झाले नसल्यामुळे हा निधी तसाच पडून आहे. अनेक नागरिक नळाला येणारे पाणी .../२

> श्रीवर्धन नगरपरिषदेचा जल शुद्धीकरण प्रकल्प व जलवाहिन्या नवीन टाकण्याचे काम याची जाहीर निविदा मंजुर झाली असून त्याची वर्कऑर्डर देखील काढण्यात आली आहे. पुढील दोन आठवड्यातच या कामाला सुरुवात होणार आहे. तसेच रानवली पाझर तलावापासून व श्रीवर्धन शहरातील सर्व जलवाहिन्या नवीन टाकण्यात येणार आहेत.
>
> **फैसल हुर्जुक, नगराध्यक्ष, श्रीवर्धन नगरपरिषद**

# खोपोलीतील त्या मुलीचा मृतदेह पाताळगंगा नदीमध्ये मिळाला

**दै.रायगड नगरी । राज साळुंके**

**खोपोली** : मंगळवारी झेनिथ धबधबा पाणी प्रवाहात दोन महिला व एक आठ वर्षाची मुलगी वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडली. यातील मेहरबानू खान - ४० वर्षे व रुबिना वेळेवर - ४० वर्षे या दोन्ही महिलांचा मृत्यू देह मंगळवारी उशिरा मिळून आला मात्र आलमा जाफर शेख - वय ८ वर्षे या चिमुकलीचा शोध ला-गला नव्हता. रात्री उशिरापर्यंत शोध मोहीम सुरु ठेवूनही यश आले नाही .बुधवारी सकाळी सहा वाजल्यापासून पुन्हा पाताळगंगा नदीच्या खोप-ोली हद्दीपासून खाली आठ -दहा किमी अंतरात शोध मोहीम सुरु करण्यात आली.अखेर सायंकाळी ४ वाजण्याच्या दरम्यान सावरोली हद्दीत या चिमुकलीचा मृत्यूदेह नातेवाईकांना आढळून आला. या मोहिमेत खोप-ोली अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक ग्रुपचे सदस्य , खोपोली पोलीस व अग्निशमन दलाचे जवान सहभागी झाले. पाच तुकड्या करून वरची खोपोली ते पुढे सावरोली पुल या दहा किमी अंतरात नदी पात्र , आजूबाजूची कपारे व झुडपे यांत कसून शोध घेण्यात आला. मात्र शेवटी तिच्या नातेवाईकांना सारसन भागात नदीच्या पात्रात आढळून आल्याने पाण्याचा प्रवाह व झाडेझुडपे असल्याने नातेवाईकांना तिला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करीत असताना मृतदेह पुढेपुढे सरकत सावरोली जवळ आल्याने बाहेर काढण्यात यश मिळाले.



# ०२ ऑक्टोबरला पनवेलमध्ये गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण महाशिबीर

## केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांची लाभणार उपस्थिती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेवा व समर्पण अभियान अंतर्गत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ०२ ऑक्टोबर रोजी पनवेलमध्ये गर्भाशय मुखाच्या कॅन्सरवर प्रतिबंधात्मक लसीकरण महाशिबीर आयोजित करण्यात आला आहे.

खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात होणाऱ्या या शिबिराचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी रायगडचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या लसीकरणाचा लाभ युवतींनी घ्यावा, असे आवाहन या कार्यक्रमाचे निमंत्रक भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी केले आहे. गर्भाशय मुखाच्या कॅन्सरची तपासणी करण्यासाठी एचपीव्ही नामक चाचणी करावी लागते. ही चाचणी महागडी असल्याने महिला याकडे दुर्लक्ष करतात. बाजारात या एका चाचणीसाठी सुमारे सात ते नऊ हजार रुपयांचा खर्च येतो. जागतिक आरोग्य संघटना (WHO)च्या अहवालानुसार गर्भाशयमुखाचा कॅन्सर हा एचपीव्ही (Human Papilloma Virus) च्या 'हाय रिस्क' प्रकारच्या विषाणूमुळे होतो. महिलांमध्ये सर्वाधिक प्रमाण असलेल्या कॅन्सरमध्ये या कॅन्सरचा चौथा क्रमांक लागतो. महिलांमध्ये धडकी भरवणारा सर्व्हिकल म्हणजेच गर्भाशय मुखाचा कॅन्सर ही जगभर मोठी समस्या आहे. या कॅन्सरच्या निर्मूलनासाठी जगभर वेगवेगळे प्रयोग सुरू आहेत. त्या दृष्टींतून या लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

# कळंबोलीत मनसेने घातले खड्ड्यांचे श्राद्ध

**दै.रायगड नगरी । दिपक घोसाळकर**

**कळंबोली** : कळंबोलीतील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या मनसैनिकांनी कळंबोली मध्ये विविध ठिकाणी असलेल्या रस्त्यातील खड्ड्यांचे श्राद्ध घालून सिडको व महापालिकेच्या कारभाराचा निषेध केला आहे. यावेळी मनसैनिक सह नागरिकांनीही सहभाग नोंदवून संताप व्यक्त केला. मनसेने आठ दिवसाचा अल्टिमेट सिडको प्रशासनाला देण्यात आला असून आठ दिवसात रस्त्याची स्थिती सुधारली नाही तर कळंबोली मनसे आक्रमकपणे आंदोलन उभारून सिडको प्रशासनाला जागे करतील असा इशारा शहराध्यक्ष राहुल गिरीश चव्हाण यांनी सिडको प्रशासनाला दिला आहे.



कळंबोली वसाहतींमध्ये निकृष्ट दर्जाचे रस्त्याचे काम झाल्याने अनेक ठिकाणी रस्त्यांची चाळण झाली आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते असा यक्षप्रश्न येथील नागरिकांनाही पडत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही कळंबोली करांना चांगले रस्ते मिळत मिळत नाहीत. ठेकेदारांवर सिडको प्रशासनाचा वरदहस्त असल्याने ठेकेदार चांगल्या प्रकारचे काम करीत नसल्याची ओरड येथील नागरिकांकडून होत आहे. वारंवार रस्त्यांमध्ये पडणारे खड्डे हा चिंतेचा विषय असून करोडो रुपयांची बिले देऊन सुद्धा नागरिकांच्या नशिबी खड्डेमय रस्ते का येतात असा सवाल येथील नागरिक विचारीत आहेत. या गंभीर समस्येकडे नागरिकांचे व सरकारचे लक्ष वेधण्यासाठी .../२

# पनवेल येथे राष्ट्रीय लोकन्यायालयात ५५७ प्रकरणे निकाली



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जिल्हा न्यायालय पनवेल तथा तालुका विधी सेवा समिती पनवेल तसेच पनवेल बार असोसिएशन पनवेल यांचेतर्फे दि.२५ ०९. २०२१ रोजी जिल्हा न्यायालय, पनवेल येथे राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. सदर राष्ट्रीय लोकन्यायालयासाठी एकूण ९ कक्ष स्थापन करण्यात येउन ९ न्यायाधीश, ५७ न्यायालयीन कर्मचारी यांनी काम पाहीले. तसेच १६ वकील पंच म्हणून उपस्थित होते.

त्यावेळी जिल्हा न्यायालय पनवेल, दिवाणी न्यायालय वरिष्ट स्तर पनवेल आणि दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकरी, पनवेल कडील दिवाणी दावे व फौजदारी प्रकरणे असे एकूण ३०७१ प्रकरणे लोकन्यायालयासमोर ठेवण्यात आली होती. त्यामध्ये १०७५ पक्षकार हजर राहून एकूण ५५७ प्रकरणे निकाली करण्यात आली आहेत. .../२

# प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाचा जिम्नॅस्ट निशांत करंदीकर भारतीय संघात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नुकत्याच इंदिरागांधी स्टेडीयमवर न्यू दिल्ली येथे यावर्षी जापान येथे होणाऱ्या ५० व्याजागतिक जिम्नॅस्टिक्स स्पर्धेकरीता सिनिअर गटासाठी व ढाका येथे होणाऱ्या सेंट्रलसाउथ आशिया जिम्नॅस्टिक्स स्पर्धेकरीता ज्युनिअर व सिनिअरगटासाठी भारतीय संघाचीनिवड करण्यात आली. यात भारतातील अनेक नामवंत खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यात प्रामुख्याने भारताची पहिली ऑलिम्पिकपटुदीपा कर्माकर सोबत अरुणा रेड्डी, प्रणति दास, श्रध्दा तळेकर तर मुलांच्या संघात आशीष कुमार, राकेश पात्रा, योगेश्वर सारख्या अनेक नामवंत खेळाडूंनी आपलीउपस्थिति नोंदविली. यात आपल्यामहाराष्ट्राच्याही अनेक खेळाडुंचा समावेश होता.



या निवड चाचणी स्पर्धेतुन महाळुंगे/बालेवाडी पुणे येथील क्रीडाप्रबोधिनि मधून सराव करणाऱ्या श्रध्दा तळेकर या एकमेवमहाराष्ट्रच्या खेळाडुची निवड करण्यात आली. तिच्या सोबत तिचे प्रशिक्षक प्रवीण डगे सरांचेही महाराष्ट्र जिम्नॅस्टिक्स संघटने मार्फत अभिनंदन करण्यात आले.त्याचप्रमाणे २६ ऑक्टोबरपासुनढाका येथे सुरु होणाऱ्या'सेंट्रल साउथ आशियाई जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत मुंबईतील विलेपार्लेच्या प्रबोधनकार ठाकरे क्रीडासंकुलातील निशांत करंदीकर याची पहिल्याक्रमांकावर निवड झाली असुन ही त्याची पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा असणार आहे.निशांत हा मुलांच्या गटातील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलातील पहिला खेळाडु आहे जोआंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करेल. निशांतच्या निवडीमुळे संकुलाचेअध्यक्ष अरविंद रमेश प्रभू व कार्यवाह मोहन राणे सर तसेच मुख्याधिकारी प्रीतम. केसकर यांच्या सहित संपूर्ण संकुलात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण आहे. निशांतने गेली ८ते १० वर्षे प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलात प्रशिक्षक विशाल कटकदौड़ व नीलम बाबरदेसाईयांच्या मार्गदर्शनाखाली जिम्नॅस्टिक्सचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. आता तो पुढील स्पर्धात्मक प्रशिक्षणासाठीनुकत्याच प्रबोधनकारठाकरे क्रीडा संकुलात रूजु झालेले जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षक शुभमगीरी यांच्या मार्गदर्शनाख़ाली जिम्नॅस्टिक्स या खेळाचे शास्त्रशुध्द प्रशिक्षणघेत आहे. प्रशिक्षक शुभमगीरी यांचीही साउथ आशियाई स्पर्धत ज्युनिअरगटासाठी भारताच्या प्रशिक्षकपदी निवडझाली आहे. वडिल डॉ. रमेशय.प्रभू व आईडॉ. पुष्पाताई र.प्रभू यांच्याकल्पनेतून साकार झालेल्या मिशन ऑलिम्पिकचे स्वप्नलवकरच पूर्ण होईल, अशी आशा अध्यक्ष अरविंद दादा प्रभू यांना वाटते. खेळाडूंना पुढेजाण्यासाठी योग्य ती मदत करण्यास समिति नेहमीच अग्रेसर राहिलेली आहे व त्यामुळेच महाराष्ट्र राज्यजिम्नॅस्टिक्स संघटनेचे प्रमुख कार्यवाह मकरंद जोशी यांनीही राज्य संघटनेमार्फ़त क्रीडा संकुलाचेआभार मानले आहेत. यापूर्वी प्रबोधनकारठाकरे क्रीडा संकुलाच्या मुलींच्या गटातून वंदिता रावल, द्विजा आशर, श्रावणी वैद्य, उर्वि अभ्यंकर, अनुष्का पवार अशा अनेक खेळाडूंनी भारताचे प्रतिनिधित्व केले आहे .

# कोलाड मध्ये मटका जुगारावर धाड

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

कोलाड पोलीस ठाण्याचे कार्यतत्पर व कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या पथकाने धडाकेबाज कामगिरी केली असून कल्याण मटका जुगार खेळ खेळविणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कोलाड पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती अशी की दिनांक २७ सप्टेंबर रोजी पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार कोलाड पोलिसांनी मौजे वरसगाव गावच्या हद्दीत पद्मावती नगर तलाठी ऑफिस लगतच्या वळणावर डांबरी रोडवर आरोपी संदेश जाधव वय २४ वर्षे रा. सिद्धाई अपार्टमेंट रोहा मूळ गाव माणगाव हा वरील तारखेच्या वेळी या ठिकाणी स्वतः च्या फायद्याकरता लोकांकडून पैसे घेऊन कल्याण नावाचा मटका जुगार हारजितीचा खेळ खेळविताना आढळून आला सदर इसमाकडू शंभर चिठ्ठयांचा बंच प्रत्येक चिठ्ठीवर लिहिलेले कल्याण असे मजकूर आढळून आले. सदर इसमावर कोलाड पोलीस ठाण्यात पोस्टेगुरं नं ००७८/२०२१जुगार अधिनियम१८६७ कलम१२ अ प्रमाणे कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ना. एस. ए. विघ्ने व कोलाड पोलीस पथक करीत असून सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांचे व कोलाड पोलिसांचे या धडाकेबाज कामगिरी बद्दल कोलाड परिसरातून कौतुक केले जात आहे.

# म्हसळा तालुक्यातील जांभुळ गावामध्ये ८ फुटी अजगराला सर्पमित्रच्या मदतीने जीवनदान

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील जांभूळ या गावामध्ये ८ फुटी अजगराला सर्पमित्र च्या मदतीने जी-वनदान दिले.

जांभूळ गौळवाडी येथील श्री.राजेश गोविंद महाडिक यांच्या घरा शेजारी ८ फुटी अजगर निदर्शनास आले. रात्री सुमारे ८.३० च्या दरम्यान अजगर परसावात जात असल्याचे प्रेम धुमाळ यांना निदर्शनास आले. त्यांनी आजुबाजुच्या ग्रामस्थांना सांगताच अजगराला पाहण्यासाठी पूर्ण गाव गोळा झाला. अजगर असल्याचे समजताच गावातील सामाजिक कार्यकर्ते निकेश देवजी भेकरे यांनी सर्पमित्र यांना संपर्क साधला. श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील सर्पमित्र वैभव दादा कदम त्याचे सहकारी प्रदीप दादा पांगारे , शुभम दादा तोडणकर यांनी २५ कि.मी वरून येऊन एक तासाच्या आत जांभूळ गौळवाडी येथे हजर राहून अजगराला जिवंत पडकले. आज ग्रामस्थांच्या सहकार्याने आणि सर्पमित्रा च्या सहकार्य ने अजगराला जीवनदान दिले.



सर्पमित्र वैभव दादा कदम यांनी ग्रामस्थांना विषारी आणि बिनविषारी सर्प यांच्या बद्दल माहिती दिली. विषारी आणि बिनविषारी सर्प चावल्यावर काय उपाय आणि काळजी घेतली पाहिजे या संदर्भात माहिती दिली. लोकांनी जागृत झाले पाहिजे. साप हा शेतकऱ्यांचा मित्र अस म्हणतात. पण सर्पाला जास्त धोका हा माणसा पासून असतो. सर्पमित्र वैभव दादा , प्रदीप पांगारे, शुभम तोडणकर याचे ग्रामस्थांनी आभार मानले. सर्पमित्र वैभव दादा यांनी ग्रामस्थांचे सुद्धा आभार मानले सर्पाला न मारता लगेचच सर्पमित्रा कडे संपर्क साधून त्याला जीवनदान दिले.

# ड्रेनेज व कचरा व्यवस्थापन करण्याची शिवसेनेची सिडकोकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहतीमधील अनेक ठिकाणी ड्रेनेज व कचरा संदर्भात समस्या असून याबाबत सिडकोने लक्ष घालून पुर्तता करावी अशी मागणी शिवसेना रायगड पनवेल जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली शाखाप्रमुख अनिल तळवणेकर यांनी सिडकोचे कार्यकारी अभियंता यांना केली आहे.

खारघर वसाहतीमधील सेक्टर २० परिसरात रस्त्यामध्ये गटारांचे खड्डे आहेत. त्यावर झाकण बसविलेले होते. परंतु वाहनांची वर्दळ होवून त्यावरची झाकणे निघालेली आहेत. तसेच अनेक ठिकाणी कचऱ्यांचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे होत नाही याचा त्रास परिसरातील रहिवाशांना होत आहे. तरी या ठिकाणी रस्त्यांचे ड्रेनेज व कचरा व्यवस्थापन करण्याची मागणी शिवसेना रायगड पनवेल जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली शाखाप्रमुख अनिल तळवणेकर यांनी सिडकोचे कार्यकारी अभियंता यांना केली असता सदर ठिकाणाची पाहणी संबंधित अधिकाऱ्यांनी केली असून लवकरच ही समस्या निकाली काढण्याचे आश्वासन त्यांनी शाखाप्रमुख अनिल तळवणेकर यांना दिली आहे.


अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात

फौ.चौ.अर्ज ९८१/२०२१

श्री.आशिषकुमार रामभवन शुक्ला
वय : ३४, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.००४, बीएलडी ७, ग्रीन एकर
सी.एच.एस.वाकडी, मोर्बे, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी
पनवेल महानगरपालिका
(कामोठे विभाग) — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार श्री.आशिषकुमार रामभवन शुक्ला यांचा मुलगा कु.अव्युक्त आशिषकुमार शुक्ला वय : ४ यांचा जन्म दि.०३/०५/२०१७ रोजी अर्जदार यांच्या राहत्या घरी रा.फ्लॅट नं.००४ बीएलडी ७ ग्रीन एकर सी एच एस वाकडी मोर्बे पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झाला होता. अर्जदार यांचा मुलगा कु.अव्युक्त आशिषकुमार शुक्ला यांची जन्माची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कु.अव्युक्त आशिषकुमार शुक्ला या वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापूसन ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि.२८/०९/२०२१ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**


# मुरुड तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याकरिता शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील ग्रामीण स्तरापर्यंतच्या विविध शासकीय यंत्रणा बळकट करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यापैकी पशुवैद्यकीय दवाखान्यांना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाहीदेखील प्रलंबित होती. मात्र पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या विषयाबाबत गांभीर्याने पावले उचलत पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी शासकीय जमिनी देण्याची कार्यवाही अत्यंत तत्परतेने सुरू केली आहे.

त्याचबरोबर पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी असलेल्या जागांची योग्य निवड व पाहणी करून पशुवैद्यकीय दवाखाने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही सुरू करण्याबाबतीतही त्यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर मुरुड तालुक्यातील येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ वळके या इमारतीच्या बांधकामासाठी शासकीय जमिनीची मागणी होती, याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार मौजे सातिर्डे, ता.मुरुड, जि.रायगड येथील गट. नं.१४१, एकूण क्षेत्र ०-८०-० हे.आर. पैकी ०-१०-०० हे.आर. क्षेत्र इतकी जमीन महसूल मुक्त व सारामाफीने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड-अलिबाग यांच्याकडे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ वळके करिता हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी नुकतेच जारी केले आहेत. मुरुड तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला पशुवैद्यकीय सुविधा मिळण्याच्या दृष्टीने हा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आला आहे.

# देवकान्हे येथे ग्रामपंचायतीचे वतीने कोरोना लसीकरण

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील देवकान्हे ग्रा.पंचायत वतीने देवकान्हे गावातील नागरिकांना कोरोना प्रतिबंधक लसिकरण कार्यक्रम उत्साहात संपन्न करण्यात आला. रोहे ग्रामीण उपजिल्हा रूग्णालय यांच्या तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी यांच्या सहकार्याने व ग्रा. पंचायत हद्दीतील गावांमध्ये कोरोना लसीकरण मोहिम ग्रा. पं.हद्दीतील गावागावात राबविण्यात येत आहे. या मोहीमेतंर्गत कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचा पहिला व दुसरा डोस सुमारे २०० लाभार्थ्यांना देण्यात आला. यावेळी येथील सरपंच वसंत भोईर, सदस्य दयाराम भोईर व अन्य सदस्य तसेच अंगणवाडी सेविका, आशासेविका उपस्थित होत्या. उपजिल्हा ग्रामीण रूग्णालय रोहा व प्रा.आरोग्य केंद्र आंबेवाडी यांच्या महत्त्वपूर्ण सहकार्याने ग्रा.पं. सरपंच वसंत भोईर व सर्व सदस्य यांच्या विशेष प्रयत्नातून राबविण्यात आलेल्या कोरोना लसिकरण मोहिमेबद्दल रहिवासी वर्गाकडून स्वागत करण्यात आले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## बेलापूर - जेएनपीटी रस्त्यावरील वाहतूक पाहणी दौरा

अहमदाबाद येथुन जेएनपीटीत मोठ्या प्रमाणात अवजड वाहतूक होते. त्याशिवाय ठिक-ठिकाणी रस्त्यांची तसेच रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचीही कामेही सुरू आहेत.त्यातच भर म्हणून की काय पावसानेही कहर केला आहे. यामुळे वाहतूकीची समस्या निर्माण होऊ लागली आहे.

दररोज होणाऱ्या प्रचंड वाहतूकीमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा त्रास भेडसावत आहेत. वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी सिडको, पोलिस, जेएनपीटी यांची संयुक्तपणे कोऑर्डीनेशन टीम तयार करण्यात आली आहे. तसेच जेएनपीटी आणि दास्तान परिसरातील सुमारे १५० हेक्टर क्षेत्रात तीन ठिकाणी पार्किंग लॉट तयार करण्यात येणार आहेत. या पार्किंग लॉटमध्ये वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था करण्यात येणार आहे.

तसेच सीएफएस आणि तालुक्याबाहेर जाणाऱ्या वाहनांना कलर कोड स्टिकर देण्यात येणार आहेत. अशी माहिती राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.सिडको, जेएनपीटी आणि वाहतूक पोलिस यांच्या मदतीने वाहतुकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी सिडको, नवी मुंबई आयुक्त यांनी योग्य प्रकारे नियोजन केले तर रस्त्यावर एकदमच गर्दी होणार नाही. त्यामुळे पोलिसांना वाहतूक नियंत्रण करणेही सोपे जाईल. वाहतूक कोंडीची समस्या, त्रास दूर होईल असा विश्वासही ना.एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

## गॅस सिलेंडरचा व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई

जुगाड मशिन, रेग्युलेटर व इतर साहित्य असा मिळून जवळपास ३९ लाख १४ हजार ८७५ रुपये मुद्देमाल हस्तगत केला असून याप्रकरणी त्यांच्या विरुद्ध भादवी कलम ४०६, २८५, ३४ सह जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ४, ७, ८ सह रेग्युलेशन ऑफ सप्लायर्स ॲण्ड डिस्टीब्युशन ऑर्डर २००० प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. या घटनेत अजूनही काही जणांचा समावेश असल्याने त्यांचा शोध तालुका पोलीस करीत आहेत.

## श्रीवर्धन नगर परिषदेचा जलशुद्धीकरण प्रकल्प रखडला

आपल्या आवारातील झाडांना सोडतात किंवा गाड्या धुतात. त्याचप्रमाणे रस्त्यावरती उन्हाळ्यात पाणीदेखील मारतात. त्यामुळे मे महिन्याच्या अखेरीला अनेक वेळा तलाव आटल्यामुळे श्रीवर्धन वासियांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. अनेक दिवस जलशुद्धीकरण प्रकल्पासाठी जागा उपलब्ध होत नसल्याचे कारण सांगून वेळ मारून नेण्यात येत होती. परंतु आता जागा उपलब्ध झाली असून सुद्धा प्रकल्पाचे काम का सुरू झाले नाही याबाबत नागरिकांमध्ये उलट-सुलट चर्चा सुरू आहेत. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने जलशुद्धीकरण प्रकल्प व जलवाहिन्या नवीन टाकण्याचे काम तातडीने सुरू करावे अशी मागणी श्रीवर्धन शहरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## कळंबोलीत मनसेने घातले खड्ड्यांचे श्राद्ध

कळंबोलीतील मनसेच्या मनसैनिकांनी आज अनोख्या पद्धतीचे रस्त्यात बसून खड्ड्यांचे श्राद्ध घालून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. या अनोख्या आंदोलनाला नागरिकांनीही उपस्थिती दर्शवून आपला पाठिंबा असल्याचे दर्शविले. या आंदोलनामध्ये राहुल चव्हाण पनवेल विधानसभा अध्यक्ष अमोल बोचरे शहर अध्यक्ष कळंबोली मनसे यांच्या नेतृत्वाखाली हे अभिनव असे आंदोलन करण्यात आले शहर उप अध्यक्ष विवेक बोराडे हे भटजींच्या भुमिकेत दिसले तसेच त्याप्रसंगी मराठी कामगार सेनेचे सरचिटणीस ॲडव्होकेट प्रशांत अनगुडे, प्रविण दळवी उप अध्यक्ष म.न.व.से, भगवान खताळ म.न.वा.से. चिटणीस, अक्षय सुतार जिल्हा अध्यक्ष रायगड चिरओ सुजित सोनवणे म.न.वा.से पनवेल तालुका चिटणीस, अनिकेत पाटील मनसे विद्यार्थी सेना संघटक नविण पनवेल, आबाजी जावीर शहर संघटक, राजेश शर्मा मनसे शाखा अध्यक्ष, निलेश दाबेराव, अतुल जाधव, रवी पवार सहभागी झाले होते.

## पनवेल येथे राष्ट्रीय लोकन्यायालयात ५५७ प्रकरणे निकाली

पंचायत समिती पनवेल कडील ग्रामपंचायत स्तरावरील एकूण २२९९ वादपुर्व प्रकरणांपैकी १३९५ प्रकरणांमध्ये तडजोड करण्यात येवून एकूण रक्कम रुपये ४०,६१,१६०/- रक्कमेची वसुली करण्यात आली आहे. तसेच स्टेट बॅक ऑफ इंडीया, बॅक ऑफ इंडीया, युनियन बॅंक, इंडीयन ओव्हरसिज बॅंक, महाराष्ट्र ग्रामीण बॅंक, आणि श्रीराम फायनान्स, इक्रीटस फायनान्स यांनी सहभाग घेतला. त्यांचेकडील एकूण ४५७ वादपुर्व प्रकरणे लोकन्यायालयासमोर ठेवण्यात येउन त्यापैकी २१ प्रकरणांमध्ये तडजोड होवून एकूण 'रक्कस रुपये ४,७२,०००/- ची तडजोड करण्यात आली आहे.

तसेच एम.टी.एन.एल. आणि एम.एस.ई.बी. कार्यालय यांनी देखील लोकन्यायालयामध्ये सहभाग घेतला होता. सदर राष्ट्रीय लोक न्यायालयाकरीता आर.जी.अस्मर, जिल्हा न्यायाधीश, पनवेल तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती पनवेल, यांचे अध्यक्षतेखाली सर्व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पनवेल आणि सर्व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग., पनवेल तसेच ॲड. मनोज भुजबळ, अध्यक्ष पनवेल बार असोसिएशन पनवेल व ॲड. प्रल्हाद खोपकर, सचिव पनवेल बार असोसिएशन आणि वकील वर्ग यांनी काम पाहीले व राष्ट्रीय लोकन्यायालय यशस्वीरित्या संपन्न झाले.


मा.गोडसे मॅडम

वकील : अमित येवले

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा.सो.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर पनवेल यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.१००५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/११/२०२१

१) श्रीमती.देवकी वासुदेव साळुंके
रा.सदनिका नं.३/४, पंचशीला को.ओ.हौ.सो.,
बिल्डींग नं.सी-७३, सेक्टर ६, कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई-४१०२१८
२) सौ.लक्ष्मी गणपत धर्णे
रा.सदनिका नं.ए-१०, सुवर्णा गंगा सोसायटी,
जुना आयरे रोड, गावदेवी मंदिराजवळ, डोंबिवली पूर्व,
टिळक नगर, ठाणे-४२१२०१
३) श्री.सुभाष वासुदेव साळुंके
रा.सदनिका नं.३/४, पंचशीला को.ओ.हौ.सो.,
बिल्डींग नं.सी-७३, सेक्टर ६, कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई-४१०२१८
४) श्री.दिनेश वासुदेव साळुंके
रा.सदनिका नं.१ बी/५०२, सिवूड हेरिटेज
को.औ.हौ.सो., भूखंड नं.५०, सेक्टर ४, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई-४१०२१०
५) सौ.मानसी शैलेंद्र गवस
रा.सदनिका नं.५०१, मयुरेश पार्क, सुरज पार्क सोसायटी
जवळ, पाखाडी खारेगांव, कळवा, ठाणे-४२१२०१ — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील मयत कै.श्री.वासुदेव बाळाजी साळुंके, रा.सदनिका नं.३/४, पंचशीला को.औ.हौ. सो., बिल्डींग नं.सी-७३, सेक्टर ६, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई-४१०२१८ यांचे दि.२०/१०/२०१२ रोजी किंवा त्या सुमारास मौजे : पिंगुळी, टेंभुर्णी नगर, ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग येथे निधन झाले. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**सदनिका नं.५०२, पाचवा मजला, बी-विंग,**
**बिल्डींग नं.१, सिवूड हेरिटेज को.औ.हौ.सो.लि.,**
**प्लॉट नं.५०, सेक्टर ४, खारघर, ता.पनवेल,**
**जि.रायगड, नवी मुंबई-४१०२१०,**
**क्षेत्रफळ ५७.३४ चौ.मी. बांधीव मधील १/२ हिस्सा,**
**मुल्य रु.३,०५,९१०/-**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारसदाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२९/०९/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क./व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क./व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे मॅडम

प्रो.जमा रु.५०/- — अर्जदारतर्फे वकील
वारस दाखला — ॲड.कैलास ना. घरत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, पनवेल वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.११७०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१०/२०२१

कै.महेंद्र रघुनाथ भगत (मयत)
१) सौ.अनुसयाबाई रघुनाथ भगत
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.कल्पना महेंद्र भगत
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
३) कुमारी.सृष्टी महेंद्र भगत
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
४) कुमार.सिद्धार्थ महेंद्र भगत
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
अर्जदार क्र.४/३ चे पालनकर्ता म्हणून
आई श्रीमती.कल्पना महेंद्र भगत
१ ते ४ रा.वरचे ओवळे, पो.पारगांव,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.०१ यांचा मुलगा, अर्जदार क्र.०२ यांचा पती व अर्जदार क्र.०३ व ०४ यांचे वडील कै.महेंद्र रघुनाथ भगत यांचा मृत्यू दि.२५/०४/२०२१ रोजी सुअस्थ हॉस्पिटल, रोडपाली, ता.पनवेल येथे झालेला असल्याचा मृत्यूचा दाखला म्युनसिपल कॉर्पोरेशन पनवेल यांनी दिलेला आहे. तसेच कै.महेंद्र रघुनाथ भगत यांचा मृत्यू समयीचा कायमचा राहण्याचा पत्ता मु.वरचे ओवळे, पो. पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड आहे. सबब कै.महेंद्र रघुनाथ भगत यांच्या मृत्यूनंतर अर्जदार क्र.१ व ४ हेच वारसदार आहेत.

कै.महेंद्र रघुनाथ भगत हे हयात असताना त्यांच्या ताबेकब्जात वहिवाटीत कसवणुकीत आणि मालकी हक्कात असलेली खालील वर्णन केलेला भूखंड व घर मिळकत आहे. सदर त्या भूखंड व घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे...

**मिळकत क्र.०१**
**नोड : पुष्पक/वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
| --- | --- | --- | --- |
| पुष्पक/वडघर | ०१ | ०२ | १०९० चौ.मी. |

**मिळकत क्र.०२**
**नोड : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र | इमारतीचे नाव |
| --- | --- | --- | --- | --- |
| पुष्पक/वडघर | आर-५ | १४० | २५.०६६ चौ.मी. कारपेट | व्ही, स्वस्तिक, सदनिका क्र.४०१, चौथा मजला |

**मिळकत क्र.०३**
**मौजे : आडिवली, ग्रामपंचायत : ढोकली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे**

| | | | | |
| --- | --- | --- | --- | --- |
| मौजे आडिवली, ग्रामपंचायत ढोकली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे | सर्व्हे नं. हिस्सा नं. ३२/१० ३२/११ | चाळ नं. २० | २३० चौ.फूट -२१.३७ चौ.मी. बिल्टअप बांधव क्षेत्र | समर्थ नगर को. ऑ.हौ.सोसायटी, सदनिका नं.०१, मौजे : आडिवली ग्रामपंचायत ढोकली |

सदर वरील भूखंड व घर मिळकत हे कै.महेंद्र रघुनाथ भगत यांचे नावे आहे. वरील मिळकतीच्या अनुषंगाने मिळणाऱ्या भूखंडा संदर्भात व इतर फायदे या करिता अर्जदार यांना वारस दाखला मिळणे करिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांया आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.२३/०९/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक: सुनील कृष्णाजी पोतदार यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ संपादक : राकेश दिलीप पितळे R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## जय गोपीनाथ प्रतिष्ठानच्या वतीने कामोठे येथे रक्तदान शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जय गोपीनाथ प्रतिष्ठान च्या वतीने कामोठे येथील सेक्टर ७ मध्ये रक्तदान शिबिर व कोरोना योद्धा प्रमाणपत्र वाटप करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुभाष आंधळे, उपाध्यक्ष, आनंद ठोंबरे, सचिव हनुमंत विघ्ने, खजिनदार संग्राम केंद्रे, सह खजिनदार,मंगेश रहाटे ,सहसचिव, ऋषिकेश सांगळे तसेच संस्थेचे–मार्गदर्शक बबन बारगजे भाजपा नेते व अनेक सहकारी यांनी हा कार्यक्रम पार पाडला .

या कार्यक्रमासाठी ठाण्यातील वर्हाडी मिसळचे मालक व युवा उद्योजक गजानन आंधळे व समस्त वंजारी समाज ठाणे शहर त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विविध स्तरातील व्यक्तींनी उपस्थिती दाखवून सहकार्य केले. मोनिका प्रकाश महानवर – सभापती–महिला–बालकल्याण समिती पनवेल महानगर पालिका, डॉक्टर राजेंद्र खाडे, डॉक्टर मारुती गीते, रामदास सांगळे, नारायण गर्जे तसेच कळंबोलीचे नगरसेवक राजेंद्र कुमार शर्मा यांनीही या कार्यक्रमात उपस्थित राहून सर्वांना शुभेच्छा दिल्या. व पुढील वाटचालीस सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कोरोना काळामध्ये ज्यांनी जीवाची बाजी लावून काम केले अशा विविध स्तरातील मान्यवरांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

## संभाजी ब्रिगेड नवी दिशा नवा विचार घेवून जिल्ह्यात काम करणार : वैभव सुर्वे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मराठा सेवा संघ प्रणीत संभाजी ब्रिगेडच्या दक्षिण रायगड जिल्ह्याच्या अध्यक्ष पदाची सूत्रे वैभव हरिश्चंद्र सुर्वे यांची निवड ऐतिहासिक किल्ले रायगडावर झालेल्या शाक्त शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या कार्यक्रमात करण्यात आली. जिल्ह्यात नवी दिशा आणि नवा विचार घेवून संविधानिक आधारावर सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाईल, असे यावेळी वैभव सुर्वे यांनी सांगितले.

मराठा सेवा संघ प्रणीत संभाजी ब्रिगेडच्या वतीने किल्ले रायगडावर छ.शिवाजी महाराजांचा द्रितीय शिवराज्याभिषेक सोहळा साजरा झाला. या सोहळ्याला संपूर्ण महाराष्ट्रातून संघटनेचे पदाधिकारी आले असता संभाजी ब्रिगेडची जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष शिवश्री सुधीरदादा भोसले यांच्या उपस्थितीत दक्षिण रायगडच्या जिल्हाध्यक्षपदाची धुरा वैभव हरिश्चंद्र सुर्वे यांच्याकडे देण्यात आली. शेतकरी आघाडीचे संतोष गव्हाणे–पाटील, प्रदेश संघटक प्रदीप कणसे, कोकण विभागीय अध्यक्ष सचिन जगदीश सावंत, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी कोकणात आलेल्या महापुरात ज्या ज्या व्यक्तींनी, संस्थांनी मदतीची मोलाची भूमिका बाजवली त्या व्यक्ती आणि संस्थांचा सत्कार देखील संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आला. महाड शहराच्या नगराध्यक्षा स्नेहल जगताप–कामत यांना हिरकणी पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. राजसदरेवर मराठा सेवा संघाच्या संभाजी ब्रिगेडच्या दक्षिण रायगड जिल्हाध्यक्षपदी वैभव सुर्वे यांची नियुक्ती करण्यात आली. किल्ले रायगडावर छ.शिवाजी महाराज यांच्या पावन भूमीत आणि त्यांच्या राजसदरेवर माझी निवड झाल्याने आपण धन्य झालो असून सर्वसामान्य माणसाच्या न्याय हक्कासाठी आपण संविधानिक पद्धतीने कायम पुढे राहू आणि संभाजी ब्रिगेडचा नवी दिशा आणि नवे विचार संपूर्ण जिल्ह्यात पोहोचवण्यास प्रयत्नशील राहू असे यावेळी वैभव सुर्वे यांनी सांगितले.



# गुलाब चक्रवात व अतिवृष्टीने भातशेतीचे प्रचंड नुकसान ; शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची मागणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोकणाला भाताचे कोठार म्हणून ओळखले जाते, मात्र आज मितीस कोकणातील शेतकरी निसर्गाच्या लहरी पणामुळे पुरता उध्वस्त झालेला आहे. नैसर्गिक आपत्ती, वादळे, अतिवृष्टीने कोकणच्या शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे.

निसर्गाचा लहरीपणा शेतकऱ्यांच्या जीवावर उठला आहे. एकेकाळी कोकणातून भात निर्यात केला जाई,मात्र आता भात आयात करण्याची नामुष्की ओढवणार असल्याची चिंता शेतकरी व्यक्त करतोय. गुलाब चक्रीवादळाचा फटका पाली सुधागड रायगड सह कोकणातील शेतकऱ्यांना बसला आहे, हातातोंडाशी आलेला घास शेतकऱ्यांच्या तोंडातून गळून पडला आहे. ठिकठिकाणी भात पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. सुधागडातील शेतकऱ्यांच्या भातपिकांची नासाडी झाली असून प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे. येथील शेतकरी रडकुंडीला आला आहे. कोकणात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे, याचाही मायबाप सरकारने विचार करावा अशी विनंती करण्यात आली आहे. पालीतील शेतकरी बाळा काटकर म्हणाले की सतत येणाऱ्या वादळाने आमच्या जीवनात वादळे निर्माण होतात, अतिवृष्टीने हातातोंडाशी आलेला घास गळून पडला आहे, शेतकरी जगला तर देश जगेल, यापूर्वी आपण अभिमानाने जय जवान जय किसन बोलायचो पण आता शेतकरी या आपत्तीने जमिनीत गाडला जातोय अशी परिस्थिती



आहे. मायबाप सरकारने शेतकऱ्याला जगविण्यासाठी आर्थिक पाठबळ देणे गरजेचे आहे, सरकारने वस्तुस्थिती प्रमाणे पंचनामे करून नुकसानीची भरपाई देणे अपेक्षित आहे. यावेळी रायगड जिल्हा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष हरीचंद्र शिंदे म्हणाले की वादळ व अतिवृष्टी ने शेतकरी पूर्णपणे देशोधडीला लागत आहे, कोकणातील या आपत्तीला सामोरे जाताना शेतकरी मेटाकुटीला येतोय, गुडघाभर पाण्यात चिखलात पीक गेल्याने ते उचलणे कठीण आहे, शेतकऱ्याला सावरण्यासाठी सरकारने योग्य ती धोरणे राबविणे अपेक्षित आहे, भिजलेला भात आधारभूत केंद्रावर विकला जात नाही, भाव मिळत नाही, शिवाय शेतकऱ्याला विकलेल्या भाताचा मोबदला देखील वेळेत मिळत नाही, सरकारी नोकरांचे पगार वाढले, सोने व इतर सर्व वस्तूंचे भाव वाढले मात्र, शेतमालाला भाव नाही, ही चिंतेची बाब आहे, शेतकऱ्याला जगविण्यासाठी शासनाने औद्योगिक तत्वावर कृषी धोरणे व उपाय योजना करणे गरजेचे आहे, असे शिंदे म्हणाले. आदिवासी नेते रमेश पवार यांनी देखील शेतकऱ्यांची व्यथा मांडली, सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या भागात मोठया प्रमाणावर अतिवृष्टी होते, आदिवासी बांधव माळरान पठारावर, नाचणी वरी बाजरी चे पीक घेतात, पण सलगच्या पावसाने पिके उध्वस्त होतात, सरकारने शेतकऱ्याला सावरण्यासाठी आवश्यक प्रयत्न व मदत केली पाहिजे, असे पवार म्हणाले. महेश पोंगडे म्हणाले की नैसर्गिक आपत्तीमुळे कोकणातील शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. सरकारची धोरणे कृषिप्रधान व शेतकऱ्याला पूरक नाहीत, शेतकरी दुर्लक्षित राहत आहे, हे देशासाठी मोठी चिंतेची बाब आहे. सरकारने शेतकऱ्याला पाठबळ देण्यासाठी कसोशीने प्रयत्न व उपाय केले पाहिजेत. असे पोंगडे म्हणाले. निसर्ग चक्रीवादळ, तौक्ते वादळ, फयान वादळ, अतिवृष्टीने शेतकरी उध्वस्त झाला, सलग दोन वर्षांपासून शेतकऱ्यांवर आस्मानी संकट ओढवले आहे, भात पीक, घर, शेती, बागा यांचे प्रचंड नुकसान झाले, या संकटातून सावरत नाही तोच अवकाळी व अतिवृष्टीच्या पावसाने भातशेतीचा पुन्हा घात केला. आठवडाभर झालेल्या पावसाने पीक मातीमोल झाले. पेरणी व कापणीचा खर्च ही निघणार नाही अशी अत्यंत बिकट अवस्था शेतकरी वर्गाची झाली आहे. जगावे की मरावे या द्विधामनः स्थितीत असलेल्या शेतकऱ्याला शासन मदतीची अपेक्षा आहे. या संकटाच्या काळात जिल्ह्यातील बळीराजाला सरकारकडून मदत मिळावी अशी मागणी जोर धरत आहे.

# दादर सागरी पोलिसांना जोहेचा राजाच्या महाआरतीचा मान



**दै.रायगड नगरी । पेण**

गणपती बाप्पाच्या मूर्तीचे माहेरघर म्हणून संपूर्ण देशात ओळख असलेल्या पेण तालुक्यातील गणेश मूर्तीचे हब जोहे गावात साखरचौथ निमित्त जोहेचा राजाची स्थापना करण्यात आली आहे. कोरोना काळ व कोणत्याही संकटात स्वतःच्या जीवाची पर्वा न करणाऱ्या दादर सागरी पोलिसांना यावेळी बाप्पाच्या महाआरतीचा मान देण्यात आला होता.

वर्षभर गणेश मूर्ती बनविण्यात पेण तालुक्यासह जोहे गावातील जेष्ठ, महिला व युवा वर्ग व्यस्त असतो. मात्र श्रीगणेश चतुर्थी गणेशोत्सव झाल्यानंतर पहिल्या संकष्टी चतुर्थीला विशेषतः पेण, पनवेल, उरण आदी तालुक्यात घरगुती व सार्वजनिक स्वरूपात मोठ्या प्रमाणात साखरचौथ गणपती सण साजरा केला जातो. त्याचप्रमाणे २०१३ साली स्थापन झालेल्या व शाळेय विद्यार्थी दत्तक घेणे, महिलांसाठी वेगवेगळे शिबीर, रक्तदान शिबिर आयोजित करणे आदी सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या जोहेचा राजा प्रतिष्ठान तर्फे गणेश मूर्तीचे हब म्हणून ओळख असलेल्या जोहे गावात दरवर्षी प्रमाणे पाच दिवसांसाठी साखरचौथ गणपती बाप्पा विराजमान झाले आहेत. यावेळी कोरोना काळातील सर्व नियमांचे पालन करून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कोणताही सण असल्यावर जनतेच्या सुरक्षेची काळजी घेणाऱ्या व धार्मिक कार्यात आपल्या कुटुंबापासून दूर असणाऱ्या दादर सागरी पोलीस स्टेशनला जोहेचा राजाच्या महाआरतीचा मान देण्यात आला होता. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक के. आर.भऊड व पोलीस कर्मचारी यांच्या हस्ते बाप्पाची आरती करण्यात आली. दरम्यान प्रतिष्ठान कडून गायक सायली पाटील यांच्या संगीत भजनाचा व महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी भाजप युवा नेते वैकुंठ पाटील, उद्योजक राजू पिचिका, नगरसेवक निवृत्ती पाटील, मनसेचे रुपेश पाटील, समाजसेवक दत्ता कांबळे, युवा नेते विवेक जोशी, शेकापचे माजी सरपंच काशिनाथ पाटील, गणेश मूर्तिकार संघटनेचे अध्यक्ष गोपीनाथ मोकल, जोहेचा राजा प्रतिष्ठानचे संस्थापक देवा पेरवी, अध्यक्ष संदेश घरत, कार्याध्यक्ष वैभव धुमाळ, महिला नेत्या निकिता पाटील, नारायण म्हात्रे, रुपेश पाटील, विनोद म्हात्रे, कमलाकर बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# उरण तालुक्यात मतदार नाव नोंदणी विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । उरण**

भारत निवडणुक आयोगाने १ जानेवारी २०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने दि. ३१ ऑक्टोबर २०२१ पर्यंत या कालावधीत नविन नोंदणी, तांत्रिक त्रुटी, मयत/दुबार/ स्थलांतर नावे कमी करणे अशा प्रकारचे अर्ज स्वीकारले जातील. तसेच दि. १ नोव्हेंबर २०२१ ते ३० नोव्हेंबर २०२१ या कालावधीत दावे व हरकती स्विकारल्या जातील.

ज्या मतदारांची नावे मतदार यादीत नाही अथवा ज्यांना दि.१ जानेवारी २०२१ रोजी १८ वर्ष पूर्ण झाले आहेत, अशा नविन मतदारांनी नमुना – ६ भरणे आवश्यक आहे. तसेच मयत, दुबार व स्थलांतरीत मतदारांची नावे मतदार यादीतुन कमी करणेसाठी नमुना – ७ भरणे आवश्यक आहे. तसेच मतदार यादीत वय, नाव, लिंग यामध्ये दुरूस्ती असेल तर नमुना – ८ भरणे आवश्यक आहे. तसेच पत्ता बदली करावयाचा असेल तर त्यांनी नमुना – ८ अ भरणे आवश्यक आहे. सदर नाव नोंदणी ऑनलाईन फॉर्म भरणे करीता www.nvsp.ळप या पोर्टलचा वापर करता येईल व Voter Helpline -pp(VHA) यापचा वापर करता येईल. अंतिम मतदार यादी ०५ जानेवारी २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदार यादीत नविन मतदारांची नावे समाविष्ट करणे अथवा नोंदीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी मतदारांनी विहीत नमुण्यात अर्ज करावे असे आवाहन १९० – उरण, सहाय्यक मतदारनोंदणी अधिकारी तथा उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी आवाहन केले आहे.

# उरण तालुक्यातील नागरी वस्त्यांमध्ये अजगरांचा वावर

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील ठिकठिकाणच्या खेड्यातील नागरी वस्त्यांमध्ये याआधी क्वचितच आढळून येणारे भले मोठे अजगर आत्ता मोठ्या संख्येने दिसु लागले आहेत. यामध्ये सर्वत्रच आढळून येणाऱ्या इंडियन रॉक पायथॉन जातीच्या अजगरांची संख्या सर्वाधिक आहे.मागील पावसाळ्याच्या दोन महिन्यांत तर भक्ष्यासाठी उरण परिसरातील नागरी वस्त्यांमध्ये आलेल्या सुमारे ३० ते ३५ अजगर सर्पमित्रांनी पकडून त्यांना त्यांच्या नैसर्गिक आवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले आहेत.

तालुक्यातील कलंबूसरे या गावामध्ये सर्वाधिक अजगर सापडले आहेत.असाच नुकताच एक साडे नऊ फुटाचा अजगर कलंबूसरे गावात रात्री १२ वाजताच्या सुमारास आढळून आला त्या अजगराला शिताफिने पकडून जंगलात सोडण्यात आले. उरण तालुक्यात औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणात वाढतच आहे. वाढते औद्योगिकीकरण आणि विकासाच्या ना–वाखाली डोंगर,दऱ्या, टेकड्या बुलडोझर फिरवून नष्ट करण्यात आल्या आहेत. यामुळे परिसरातील वनसंपदा नष्ट झाली आहे.बेसुमार वृक्षतोडीमुळे नैसर्गिक हिरवळही सिमेंट कॉक्रीटच्या वाढत्या जंगलात हरवुन गेली आहे.परिणामी वन्यजीवांची आश्रयस्थाने नष्ट झाली आहेत.वन्य जमीनींवर मानवांचे अतिक्रमणही वाढले आहे.मानवांच्या वाढत्या अतिक्रमणामुळे जंगलातील वन्यजीवांनी भक्षांसाठी आता आपला मोर्चा नागरी वस्त्यांमध्ये वळवला आहे. याआधी नागरी वस्त्यांमध्ये पक्षी आणि विविध प्रकारचे साप आणि अन्य सरपटणारे मोठ्या प्रमाणात आढळून येत होते.त्यामध्ये आता भल्यामोठ्या अजगर ही येऊ लागले आहेत .याआधी कधीतरी आढळून येणारा अजगर आता भक्ष्यांच्या शोधार्थ नागरी वस्त्यांमध्ये येताना आढळून येऊ लागले आहेत.मागील दोन महिन्यात उरण परिसरातील विविध ठिकाणाहून सुमारे ३० ते ३५ अजगर सापडले आहेत.यामध्ये लहान मोठ्या आकार आणि लांबीच्या अजगरांचा समावेश आहे.

१० ते ३५ किलो वजनाचे अजगर बकऱ्या,कुत्री, मांजरे, उंदीर, कोंबड्या खाण्यासाठी नागरी वस्त्यांमध्ये येतात.असे अजगर कधी कोंबड्यांच्या खुराड्यात कधी बकऱ्यांच्या गोठ्यात भक्षाच्या शोधात वावरतांना आढळून येत आहेत.काही वेळा तर परिसरात यांत्रिक दगदगीच्या ठिकाणी असलेल्या कंटेनर मालाच्या गोदामात ही भले मोठे अजगर आढळून आले आहेत. यामध्ये सर्वत्रच आढळून येणाऱ्या इंडियन रॉक पायथॉन जातीच्या अजगरांची संख्या सर्वाधिक आहे.

---

मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील : ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज क्र.९६४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२७/१०/२०२१

श्री.शफीक अहमद खान
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.२०२, शिवभूमी, प्लॉट नं.३५,
सेक्टर ३५ आय, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
खारघर विभाग, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार श्री.शफीक अहमद खान यांचे वडील पै.इकबाल अहमद मोहम्मद अमीन खान यांचा मृत्यू दि.०६/०५/२०२० रोजी मौजे : फ्लॅट नं.२०२, शिव भूमी प्लॉट नं.३५, सेक्टर ३५ आय, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मरण पावले आहे. सदरहू अर्जदार यांनी पै.इकबाल अहमद मोहम्मद अमीन खान यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता अर्जदार यांनी सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

सदरहू पै.इकबाल अहमद मोहम्मद अमीन खान वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे सदरहू पै.इकबाल अहमद मोहम्मद अमीन खान यांची मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२७/०९/२०२१ रोजी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

---

मा.गोडसे मॅडम

वकील : अमित येवले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.सो.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर पनवेल यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.८७२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१०/२०२१

१) श्रीमती.कृपाली कृष्णकांत शिंदे
रा.रुम नं.५, कुपर बिल्डींग, गोखले सोसायटी,
क्रॉस लेन, परेल, मुंबई–४०००१२
२) श्री.तुषार कृष्णकांत शिंदे
(मुखत्यार म्हणून राहूल कृष्णकांत शिंदे)
रा.रुम नं.५, कुपर बिल्डींग, गोखले सोसायटी,
क्रॉस लेन, परेल, मुंबई–४०००१२
३) श्री.राहूल कृष्णकांत शिंदे
रा.रुम नं.५, कुपर बिल्डींग, गोखले सोसायटी,
क्रॉस लेन, परेल, मुंबई–४०००१२ — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ चे पती व क्र.२ व ३ यांचे वडील मयत कै. श्री.कृष्णकांत नारायण शिंदे, रा.रुम नं.५, कुपर बिल्डींग, गोखले सोसायटी, क्रॉस लेन, परेल, मुंबई–४०००१२ यांचे दि.२४/०७/२०१९ रोजी किंवा त्या सुमारास कल्याण पश्चिम, जिल्हा : ठाणे, महाराष्ट्र ४२१३०१ येथे निधन झाले. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका नं.३०४, सी–विंग, तिसरा मजला, सत्य संस्कार को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.३०, सेक्टर १ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई–४१०२१८, क्षेत्रफळ ३९.९० चौ.मी.बांधीव व ११.७० चौ.मी.टेरेस, मुल्य रु.४,९६,३३२/–**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारसदाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/– क.लिपीक दि.न्या.क./व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क./व.स्तर, पनवेल

---

मा.गोडसे मॅडम

वकील : अमित येवले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.सो.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर पनवेल यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.५१२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/१०/२०२१

१) श्री.कुंजन मेंकी राजन
रा.सदनिका नं.के.एल.६ (ए)/०९/१५,
भूखंड नं.१४, सेक्टर १ ई, कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई
२) श्री.राजेशकुमर कुंजन राजन
रा.सदनिका नं.के.एल.६ (ए)/०९/१५,
भूखंड नं.१४, सेक्टर १ ई, कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ ची पत्नी अर्जदार क्र.२ यांची आई मयत कै. श्रीमती.मनी कुंजन राजन, रा.सदनिका नं.के.एल.६ (ए)/०९/१५, भूखंड नं.१४, सेक्टर १ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई–४१०२१८ यांचे दि.२३/१२/२०१५ रोजी किंवा त्या सुमारास अम्रीता इंस्टीट्युट ऑफ मेडीकल सायन्स, एर्नाकुलम, राज्य केरळ, येथे निधन झाले. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालील प्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**अपार्टमेंट नं.के.एल.६ (ए)/०९/१५, सेक्टर १ ई, तिसरा मजला, बिल्डींग नं.के.एल.६ (ए)/०९/१५, भूखंड नं.१ ई/१४, सेक्टर १ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई–४१०२१८ क्षेत्रफळ ५४.३० चौ.मी. बांधीव, मुल्य रु.४,१५,०००/–**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारसदाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/– क.लिपीक दि.न्या.क./व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क./व.स्तर, पनवेल

---

मा.मुजावर साहेब

अर्जदारांचे वकील : ॲड.एकनाथ जी. खुटले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.२ रे सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०९३/२०२१
नि.नं.१३/ड
ने.ता.३०/१०/२०२१

१) श्रीमती.लिलाबाई कृष्णा गायकवाड (मयत वारसदार)
२) श्री.धनराज कृष्णा गायकवाड, वय : ५७ वर्षे
३) श्री.संतोष कृष्णा गायकवाड, वय : ४२ वर्षे
४) सुरेखा कृष्णा गायकवाड, वय : ३७ वर्षे
क्र.१ ते ४ रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.सपना सचिन पाटील, वय : ३९ वर्षे
रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.कृष्णा गणपत गायकवाड हे दि.१०/०५/२०२१ रोजी मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत आणि कै.लिलाबाई कृष्णा गायकवाड या दि.२६/०९/२०२१ रोजी पॅरामाऊंट मेडीकल सर्व्हीस प्रा.लि. पनवेल येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**जमिनींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| ओवळे–८४ | १३ | ३ | ०–३०–६ |
| | १४२ | २ ब | ०–१४–७ |
| | १४२ | १२ अ | ०–११–६ |

सदर मिळकतींचे संपादनाच्या मोबदल्यात खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक | ३ | ४१२ | ८८० |

अर्जदार या कै.कृष्णा गणपत गायकवाड यांचे कायदेशीर वारसदार आ–हेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.२९/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## प्रा.शाळा मुठवली खु.दुरूस्तीसाठी पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याकडून रू.३ लाखाच्या निधीचे पत्र

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील प्रा.शाळा मुठवली खु.या शाळेच्या दुरूस्ती कामासाठी रा.जि.कर्तव्यदक्ष पालकमंत्री ना.आदिती तटकरे यांनी रू.३ लाखाच्या निधी उपलब्ध करून दिला आहे व तशाप्रकारचे निधी मंजुरीचे पत्र ग्रामस्थांना देण्यात आले आहे.

साखरचौथ गणेशोत्सव निमित्त पालकमंत्री आदिती तटकरे यांनी मुठवली खु.येथे सदिच्छा भेट देऊन गावात स्थानापन्न केलेल्या साखरचौथ गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले.यावेळी त्यांनी शाळा दुरुस्तीसाठी मंजूर केलेल्या निधीचे पत्र ग्रामस्थांना दिले यावेळी तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक अध्यक्ष जयवंत मुंडे व पदाधिकारी मयूर खैरे, प्रसाद देशमुख, यांच्यासह गाव कमिटी अध्यक्ष सतिष ठाकूर,युवा कार्यकर्ते महेश तुपकर, मारुती तुपकर, चंद्रकांत शिंदे,योगेश शिंदे,मंगेश तुपकर,रोहिदास तुपकर,संतोष तुपकर, प्रमोद ठमके,येनाजी शिंदे,नागेश खंडागळे,तानाजी ठमके,सचिन तुपकर,धनराज शिंदे,रामचंद्र शेळके,शिवतेज शिंदे,प्रकाश तुपकर, ज्ञानेश्वर शिंदे, ऋषिकेश खंडागळे,सौरभ ठाकूर,मयुरेश तुपकर,गणेश शिंदे,संदेश तुपकर,मनोज शिंदे,गौतम सावंत,संतोष शेळके, अनंत फणसे तसेच गावातील प्रतष्ठित व्यक्ती, युवक, युवती व सर्व ग्रामस्थ महिला मंडळ,युवक मंडळ तसेच भजन मंडळातील सर्व सांप्रदायिक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान पालकमंत्री आदिती तटकरे यांनी शाळा दुरूस्तीसाठी रू.३ लाखाचा निधी मंजूर केल्याने मुठवली खु.ग्रामस्थांनी त्यांचे जाहिररित्या आभार व्यक्त केले आहेत.




### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


### पोलादपूरमध्ये बॉक्स कटींगच्या अंडरपास महामार्गावर कोसळणाऱ्या

# सर्व्हिसरोडची भगदाडं लपविण्यासाठी टाकताहेत लालमातीचा भराव

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरण कामात यंदा पावसाळा सुरू झाल्यापासून बॉक्स कटींगच्या अंडरपास महामार्गावर कोसळणाऱ्या सर्व्हिसरोडला मोठमोठी भगदाडे पडू लागली आहेत. ही भगदाडं लपविण्यासाठी एलॲण्डटी ठेकेदार कंपनीने अंडरपास महामार्गावर सर्व्हिसरोडवरून लालमातीचे ढिगारे डम्परने टाकण्यास सुरूवात केली असून बॉक्स कटींगला काँक्रीटफोमचे तीन थर देण्याऐवजी काँक्रीटची संरक्षक भिंत उभारण्याची गरज स्पष्ट झाली आहे. मात्र, चौपदरीकरण कामी आर्थिक चणचण असल्याचे अधिकृत पत्र नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाकडून प्राप्त झाले असताना पोलादपूर येथे चौपदरीकरणाच्या नावाखाली मंजूर आराखड्याव्यतिरिक्त सुरू असलेल्या उधळपट्टीमुळे बॉक्सकटींगला काँक्रीटफोमचे थर देण्याऐवजी संरक्षक भिंती उभारणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाल्याने आता महामार्गाचे चौपदरीकरण सर्व्हिस रोडला समांतर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



पोलादपूर शहरामध्ये काही भूसंपादन झालेल्या बाधितांच्या कलाने मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणहोत आहे तर दुसरीकडे, बॉक्स कटींगच्या अंडरपास महामार्गावर कोसळणाऱ्या सर्व्हिसरोडला मोठ-मोठी भगदाडे पडून पूर्वेकडील सर्व्हिसरोडला धोका निर्माण झाला. पावसाचा जोर वाढू लागल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोरील पुलावरून पश्चिमेकडील पूर्ण वापरात नसलेल्या सर्व्हिस रोडला देखील खिंडारं पडून लाल मातीचे ढिगारे बॉक्स कटींगच्या खंदकात कोसळू लागले आहेत. यामुळे बॉक्स कटींगला केवळ काँक्रीटचे तीन थर देऊन सर्व्हिस रोड कोसळण्याचा प्रकार थांबणार नाही हे स्पष्ट झाल्याने ज्याठिकाणी सर्व्हिस रोड कोसळला; तेथील भगदाडं लपविण्यासाठी एलॲण्डटी ठेकेदार कंपनीने भगदाडं लपविण्यासाठी डम्परने लाल मातीचे ढिगारे पूर्व आणि पश्चिमेच्या सर्व्हिस रोडवरून ओतल्याने आता तेथील बॉक्स कटींग अंडरपास रस्त्याने दोन दरीतील निमूळत्या भुभागाचे स्वरूप धारण केले आहे. यामागे एलॲण्डटी कंपनीला केवळ काँक्रीट रस्ता केल्यानंतरच बिलाची रक्कम अदा होत असल्याने अंडरपासमधून चौपदरीकरणाचा रस्ता नेण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. ज्यावेळी या दरीसदृश्य भागापर्यंत पोहोचेल त्यावेळी तातडीने हे दरीसदृश्य ढिगारे हटवून बॉक्स कटींगच्या कोसळणाऱ्या भागावर काँक्रीट फोमचे तीन थर मारून चौपदरीकरणाचा काँक्रीट रस्ता पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. यामुळे बिलं मिळण्याइतपत दृश्यमान परिस्थिती निर्माण होणार असली तरी पूर्व आणि पश्चिमेकडील सर्व्हिस रोडमधून काँक्रीट फोमला भगदाडं पडून सर्व्हिस रोड भविष्यात कायमच या अंडरपास महामार्गावर कोसळत राहणार आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर मुंबईकडून पोलादपूर शहरात प्रवेश करताना नियोजित मंजूर आराखड्यातील सर्व्हिस रोड गायब झाला असून पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये थेट चौपदरीकरणाच्या राष्ट्रीय महामार्गावरून प्रवेश कसा करायचा हे समजून येत नाही. याच आराखड्यात छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या मागील बाजूचा एकच पुल मंजूर झाला असताना अन्य चार पुलांचे बांधकाम काही भूसंपादन झालेल्या बाधितांच्या दुकानांसमोर झाले आहे. बॉक्स कटींगला काँक्रीट फोमऐवजी काँक्रीटच्या संरक्षक भिंती आवश्यक असताना एस.टी.स्थानकालगतच्या डोंगराजवळच्या बाधिताच्या जमिनीला मात्र संरक्षण देण्यासाठी काँक्रीटची संरक्षक भिंत उभारण्यात आली आहे. ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ मंदिर तसेच रयत विद्यामंदिराकडे आणि गोकूळनगरकडे जाण्यासाठी या पुलांची गरज असल्याचे कोणालाही दिसत नाही अथवा ऐकायला येत कसे नाही, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

नुकतेच मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ असल्यापासून क्रमांक ६६ होईपर्यंत लढा देणारे पनवेल तारा येथील संतोष ठाकूर यांनी उमरठ येथील विश्रामगृहामध्ये आयोजित चर्चासत्रामध्ये संजय यादवराव यांच्यासमोरच २००६ पासून चौपदरीकरणाचे प्रयत्न सुरू झाल्याचा उल्लेख करीत सध्या पोलादपूर तालुक्यात पुढाकार घेणारे त्यावेळी नव्हते, याचे स्मरण करून दिले. यावेळी त्यांनी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे पोलादपूरकरांना अंडरपास स्वरूप मान्य नसायला हवे असे स्पष्ट करून यासाठी वेळप्रसंगी आंदोलनाची भूमिका घेण्याची गरज व्यक्त केली आहे.

पोलादपूर शहरातील अंडरपास महामार्ग बुजवून पूर्वीप्रमाणे सध्याच्या सर्व्हिस रोडला समांतर पातळीवरून चौपदरीकरण होण्यासाठी रायगड जिल्ह्यातील सर्वच सामाजिक संघटनांकडून आंदोलन छेडण्याची गरज असल्याचे सांगितले. याकामी जनसुनावणीशिवाय हा अंडरपास महामार्ग पोलादपूर शहरातील महामार्गालगतच्या बाधितांना तसेच तालुक्यातील जनतेच्या माथी मारणे अयोग्य असल्याचे संतोष ठाकूर यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

एकीकडे नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाकडे आर्थिक चणचण असताना पोलादपूर शहरात मंजूर आराखड्यात समाविष्ट नसलेले चार जादा पूल बांधण्यासाठी आर्थिक उप-लब्धता कशी झाली असेल, असा प्रश्न उदभवत आहे. कोकणाकडे जाताना जमिनीखालून अंडरपास महामार्गावरून वाहतूक होणार असल्याने पोलादपूरकरांना पोलादपूर शहराच्या अस्तित्वासाठी या बॉक्स कटींग अंडरपास महामार्गाच्या खंदकात आंदोलन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## १४ वर्षीय शाळकरी मुलाचा मोबाईल लुबाडून नेणाऱ्या तोतया पोलिसांचा शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**


पोलीस असल्याची बतावणी करुन दोघा भामट्यांनी एका १४ वर्षीय शाळकरी मुलाच्या हातातील मोबाईल फोन घेऊन पलायन केल्याची घटना पनवेलमध्ये घडली. पनवेल शहर पोलिसांनी या तोतया पोलिसांविरोधात फसवणुकिचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील १४ वर्षीय शाळकरी मुलगा पनवेल मधील जुना ठाणा नाका येथे रहाण्यास आहे. सदर मुलगा अधुन मधुन बल्लाळेश्वर तलावाच्या बाजुला मित्रांसोबत फिरण्यासाठी जात असतो. हा मुलगा आपल्या मित्रांना भेटण्यासाठी पायी चालत अमरधाम येथे पोहोचला होता. यावेळी त्याचे मित्र आले नसल्याने तो मित्रांची वाट पहात मोबाईलवर बोलत उभा असताना, त्याठिकाणी मोटारसायकलवरून आलेल्या दोघा व्यक्तींना पाहून सदर मुलाने घाबरुन गार्डन हॉटेलच्या दिशेने पळण्यास सुरुवात केली. त्यामुळे मोटारसायकलवरुन आलेल्या दोघा भामट्यांनी पोलीस असल्याचे सांगून त्याला अडविले. तसेच याठिकाणी चोऱ्या माऱ्या होत असल्याने चेकींग सुरु असल्याचे सांगून त्याच्याकडे विचारपुस करण्यास सुरुवात केली. यावेळी सदर मुलाकडे असलेल्या मोबाईलवर त्याच्या आईचा फोन आल्याने त्याने सदर फोनवर बोलण्यास सुरुवात केली. याचवेळी एका भामट्याने सदर फोन आपल्याकडे घेऊन सदर ठिकाणी गुन्हे घडत असल्याचे तसेच त्यांचा मुलगा त्याठिकाणी फिरत असल्याचे सांगुन फोन कट केला. त्यानंतर सदर भामट्यांनी मोबाइल फोन त्या मुलाकडे न देता त्यांनी सदर मोबाइल घेऊन मोटारसायकलवरून पलायन केले. त्यानंतर सदर विद्यार्थ्याच्या वडीलांनी आपल्या मुलाला घेऊन पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

## ग्राहकांची वीज कनेक्शन कापली ; ग्राहकांमधून संताप

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन** : महावितरणने वीज ग्राहकांकडून लवकरात लवकर वसुली करण्यासाठी चालू महिन्याची बिले न भरलेल्याची वीज कनेक्शन कापण्याचे उद्योग सुरू केले आहेत. वास्तविक पाहता ज्या तारखेला वीज बिल भरणा करण्याचा असतो त्या तारखेच्या एक दिवस अगोदर वीज ग्राहकांना बिले मिळतात. त्यानंतर काही वीज ग्राहकांचे पगार झालेले नसल्यामुळे वरचा सर चार्ज भरून ग्राहक वीज बिले भरत असतात. परंतु महावितरणकडून बिले वितरण करण्यास विलंब होत असल्याचे वीज ग्राहकांचे म्हणणे आहे.



ज्या वीज ग्राहकांची बिले पाचशे ते हजार रुपयाच्या सरासरी मध्ये असतात अशा ग्राहकांची देखील वीज जोडणी महावितरणने चालु बिल न भरल्यामुळे कापली आहे. जे ग्राहक वीज देयक भरण्याच्या तारखेनंतर बिले भरतात त्यांच्याकडून महावितरण दहा रुपयांपासून पन्नास रुपये पर्यंत सरचार्ज वसूल करत असते. परंतु असे असताना देखील महावितरणने चालू महिन्याची बिले न भरल्याने वीज जोडणी कापण्याचा उद्योग सुरू केल्याचे पाहायला मिळत आहे. ज्या दिवशी अंतिम वीज वीज देयक भरण्याची तारीख असते त्याच्या कमीत कमी आठ दिवस अगोदर ग्राहकांना वीज बिले देण्यात यावी अशी मागणी ग्राहकांमधून करण्यात येत आहे. ज्या ग्राहकांची एक महिन्याच्या वरती बिले थकीत असतील त्यांचे वीज कनेक्शन कापले तर ठीक आहे. परंतु चालू महिन्याचे वीज बिल भरले नाही म्हणून लगेच त्याचे वीज कनेक्शन कापणे योग्य नाही. महावितरणच्या या दंडेलशाही कारभाराविरोधात ग्राहकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

> महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयाकडून वीज बिल वसुली साठी अत्यंत सक्त पावले उचलण्यात येत आहेत. त्यामुळे आम्हाला ऑगस्ट महिन्याची वीज बिले ज्यांनी भरली नाहीत, त्यांचे वीज कनेक्शन कापण्या शिवाय पर्यायच नाही. ग्राहकांनी वीज बिले वेळेवर भरावी म्हणजे वीज कनेक्शन कापण्याची वेळ येणार नाही.
>
> **- महेंद्र वाकपैंजण, सहाय्यक कार्यकारी अभियंता, महावितरण, श्रीवर्धन**

## तळोजा गाव येथे रस्ता दुरुस्त करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा गाव कमानीपासून ते बागे गृहसंकुल सेक्टर ४० हा रस्ता तातडीने दुरुस्त करून द्यावी अशी मागणी आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे करण्यात आली आहे.

यावेळी सतिश पाटील अध्यक्ष, पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस, अजिनाथ सावंत उपाध्यक्ष, पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस, शहबाज पटेल कार्याध्यक्ष, पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस, बळीराम नेटके अध्यक्ष, खारघर शहर, प्रशांत रणावरे युवा नेते, रियाज हमदुले, शाहजहान चौगले, मुश्ताक अंतुले, फैजान मोमीन आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, तळोजा हे गाव पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील एक मोठे गाव आहे. या गावामध्ये मोठ्या प्रमाणात लोकसंख्या आहे. तळोजा गावामध्ये तळोजा कमानीपासून ते नव्याने वसाहत निर्माण झालेल्या बागे गृहसंकुल सेक्टर ४० पासूनचा रस्ता अत्यंत खराब व दुरावस्थेत आहे.



येथून ये-जा करताना येथील रहिवाशांना नेहमीच त्रास होत आहे. त्याचप्रमाणे पावसाळ्यात खड्ड्यांचा अंदाज न आल्याने दुचाकी तसेच चार चाकी वाहनांचा अपघात व वाहन सुद्धा नादुरुस्त होत आहेत. तरी या संदर्भात लक्ष घालून पनवेल महानगरपालिकेने चांगल्या दर्जाचा रस्ता उभारुन द्यावा, अशी मागणी कार्याध्यक्ष शहवाज फारुक पटेल यांनी केली आहे.

## पनवेल तालुक्यात मनसेच्या महिला विभाग पदाची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पनवेल मनसे व आदई गाव या ठिकाणी मनसेच्या महिला विभाग पदाची नवनियुक्त करण्यात आली आहे. महिला जिल्हाध्यक्ष ज्योती मालवणकर व रायगड जिल्हा सचिव केसरीनाथ पाटील व रायगड उपजिल्हा अतुल चव्हान व तालुका अध्यक्ष अविनाश पडवळ व तालुका महिला अध्यक्ष वर्षा पाचभाई, पनवेल शहराध्यक्ष संजय मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली व सुजित सोनावणे तालुका चिटणीस वाहतूक यांच्या सहकाऱ्यांनी नियुक्ती करण्यात आलेले आहे.

पनवेल शहर महिला उपाध्यक्ष स्वरूपा सुर्वे, उपाध्यक्ष योगिता गुंजाळ व आदई महिला अध्यक्ष सपना सोडकार, उपाध्यक्ष नूतन लिमन, सचिव अर्चना कोल्हे, सहसचिव बाला रावत व तक्का शाखा अध्यक्ष शोभा गोडविले, उसर्ली शाखा अध्यक्ष रोहिणी पाटील या सर्वांची निवड करण्यात आली आहे.

या वेळस अनेक पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.मनसे पक्षाची ध्येय धोरण व पक्षाची बांधणी ही ग्रामीण भागात व्हावी यासाठी आज महीलाची नव नियुक्ती करण्यात आलेली आहे.

## मिहीर परदेशीची आशिया बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

साऊथ एशियन फेडरेशन ऑफ ऑल स्पोर्ट्सच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ' ओपन इंटरनॅशनल गेम्स २०२१' बॅडमिंटन स्पर्धेत सीकेटी महाविद्यालयाचा विद्यार्थी मिहीर मदन परदेशी याने बॅडमिंटन पुरुष खुल्या एकेरी गटातील स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावून सुवर्ण कामगिरी केली. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मिहीरचा सत्कार करण्यात आला.

नेपाळ येथील शान बँक्वेटमध्ये बॅडमिंटन आशिया स्पर्धेत २० वर्षीय मिहीर परदेशीने सरस कामगिरी करत सुवर्ण पदक पटकाविले. मिहीर चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचा टीवाय बीकॉमचा विद्यार्थी आहे. शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रात त्याने केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. या कामगिरीबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य वसंत ब-हाटे, उपप्राचार्य एस. के. पाटील, क्रीडा शिक्षक विनोद नाईक यांच्यासह अनेक मान्यवरांनी मिहीरचे अभिनंदन केले.

## तळा शहरात शिवसेनेकडून विकासकामांचा धडाका

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा** : तळा शहरात शिवसेनेकडुन विकासकामांचा धडाका सुरु असुन शहरातील अनेक समस्या सोडवून रहिवाश्यांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यास त्यांना यश आले आहे. गेली दोन वर्ष कोरानामुळे विकासकामे करता आली नाही परंतु आता विकास कार्य बाधीत होणार नाहीत याची दक्षता घेत नगरपंचायत निवडणुक पुर्वी समाज कार्याचा ध्यास घेवुन शिवसेना पक्षाकडुन विकास कामांचा धडाका सध्या तळा शहरात सुरु आहे.



दिलीप दलाल ते मोहन लिमकर (कासार अळी बाजारपेठ) यांच्या घरापर्यंत गटार बांधणे, कासार समाज स्वामी समर्थ सभागृह बांधणे, मधली अळी गणपती मंदीर चंडिका कॉप्लेक्स परिसर गटार बांधणे व रस्ता तयार करणे, वरचा मोहल्ला उर्दू हायस्कूल तळा संरक्षित भिंत बांधणे, वडाची वाडी पारधी आळी मोहीते आळी रस्ता करणे सुतार आळी प्रकाश झापकर ते दिलीप वडके यांच्याा घरापर्यंत रस्ता करणे सुतार आळी येथील सामाजिक सभागृह बांधणे, नगरपंचायत ते वरचा मोहल्ला पासुन म्हसोबा आळी होळी पर्यंत नगरपंचायत ते दिलीप दलाल यांच्याकडे घराकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे, मधली अळी गुरव समाज स्माशान भुमी शेड चोथरा संरक्षण भिंत बांधणे आनंदवाडी येथे अंतर्गत रस्ता करणे रोहीदास वाडी अंतर्गत रस्ता करणे नाभिक समाज समाजिक सभागृह बांधणे जोगवाडी येथे अंतर्गत रस्ता करणे राणेची वाडी गोळे अळी येथे अंतर्गत रस्ता बांधणे, जोगवाडी स्मशानशेड दुरुस्ती व सुशोभिकरण जोगवाडी येथील श्री.चंडिकादेवी सभामंडप शेड बांधणे शहरातील जवळ जवळ प्रत्येक प्रभागात ठिकठिकाणी विकासकामे प्रगतीपथावर आहेत काही सुरु आहेत तर काही पूर्णत्वास आलेली आहेत.

शहरात कोट्यावधी रूपयांची विकासकामे मंजुर करून तीचे केवळ भुमीपुजन न करता कामे पुर्ण करण्याचा जिल्ह्यात नवा किर्तिमान तळा नगरपंचायतीच्या माध्यमातून केला जात असल्याचा दावा शिवसेना पक्षाकडुन केला जात आहे.

रोहिदास आळी येथे अंतर्गत रस्ता बांधणे या कामाचे भुमीपुजन शिवसेनेचे जेष्ठ नेते श्री.लिलाधर खातु, नगरसेविका विसंती तळकर यांच्या शुभास्ते पार पडले यावेळी शहर प्रमुख राकेश वडके, नगरसेविका स्नेहल तळकर, तळेगाव ग्रामपंचायत उपसरपंच संदीप दळवी, गुरुदास तळकर, शौकत भाई कुरूक्कर, लक्ष्मण निगुडकर, सागर तळकर, अनिल तळकर, अब्दुल कुरूक्कर, प्रभाकर कोलवणकर आदी मान्यवर उपस्थित होते.या कामाचे पहाटे भुमीपुजन करुन संध्याकाळ पर्यंत हे काम पुर्ण करण्यात आले.